# लक्ष्मीबाई टिळक

**प्रा. तेजस्विनी भोसले**
कमला कॉलेज, कोल्हापूर
**Email- tejaswinibhosale89@gmail.com**

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यातील 'स्मृतिचित्रे' या आत्मकथनाच्या लेखिका आणि कवयित्री तसेच कवी रेव्हरंड नारायण वामन टिळक यांच्या पत्नी लक्ष्मीबाई टिळक यांचे पूर्वाश्रमीचे नाव मनूताई (मनकर्णिका) गोखले असे होते.११ वर्षांच्या मनूताईचा विवाह प्रसिद्ध कवी रेव्ह. नारायण टिळक यांच्याशी झाला. विवाह झाल्यावर त्यांचे नाव 'लक्ष्मीबाई' ठेवण्यात आले. लक्ष्मीबाई यांच्या माहेरी शिक्षणाचे वातावरण नव्हते. त्यामुळे विवाहानंतर टिळकांनी त्यांना शिकवण्यास सुरुवात केली. लक्ष्मीबाई यांच्या जीवनातील अंत्यत कठिण प्रसंग म्हणजे १८९५ मध्ये टिळकांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार होय. टिळक धर्मांतर करणार हे कळल्यावर लक्ष्मीबाई कासावीस झाल्या. त्या विषयी त्या कवितेतून आपले मत व्यक्त करतात. 'म्हणे जातो सोडून नाथ माझा, आता कवणाला बाहू देवराजा....' ही चार ओळींची कविता लिहिली. हे लक्ष्मीबाई टिळकांचे पहिले काव्यलेखन होय. त्यानंतर ५ वर्षांनी ख्रिस्ती धर्माचा अभ्यास केल्यावर त्यांनी डोळसपणे तो धर्म स्वीकारला. वर्ष १९१३ च्या सुमारास त्या कीर्तनही करू लागल्या.

**लक्ष्मीबाई यांचे बालपण व घरातील सोवळे परंपरा:**

लक्ष्मीबाई यांचा जन्म १ जून १८६८ नाशिक जवळील जलालपूर येथील अत्यंत कर्मठ अशा गोखले कुटुंबात झाला. त्यांचे लहानपणीचे नाव 'माणिकर्णिका' होते. त्यांच्या वडलांचे नाव नारायणराव आणि आईचे नाव राधाबाई होते. त्यांना भिकूताई, केशव, भागीरथी, विष्णू अशी चार भावंड होती. लक्ष्मीबाई त्यांच्या आत्या यांच्याकडे दत्तक गेल्या होत्या

लक्ष्मीबाई यांच्या जन्माच्या अगोदपासूनच त्यांच्या घरात सोवळे पाळले जात होते. लक्ष्मीबाईंच्या वडिलांनी (नाना) आयुष्यभर सोवळे पाळले. त्या काळात जातिभेदाच्या भिंती किती कडेकोट हे दिसून येते. त्या सांगतात,नाना कोठेतरी बाहेर गेले होते आणि असे ओलेत्याने घरी आले. त्यांना विचारेले तर ते म्हणाले, 'तपोवनात गेलेले तेथे एक महार तोंड धूत होता, आणि त्याचा शिंतोडा माझ्या अंगावर उडाला. त्याचा विटाळ झाला आहे.' यातून त्यांच्या वडिलांची सोवळे पाळण्याची कडक परंपरा दिसून येते. त्यांनी या परंपरेमुळे घरातील कोणतीच जबाबदारी पूर्ण केली नाही. खाण्याचे पदार्थ देखील धुवून घ्यावेत असा त्यांचा दुराग्रह होता. अशा त्यांच्या स्वभावामुळे घरातलेच नाहीतर सारा गाव त्रासून गेला होता.

**लक्ष्मीबाई यांचा विवाह व लग्नानंतरचा सासुरवास :**

नाशिक मध्ये नारायण वामन टिळक नावाच्या विद्यार्थ्याची कीर्ती ऐकून नानासाहेबांनी मनूचे लग्न यांच्याबरोबर होण्याविषयी आग्रह धरला. लग्नापूर्वी मनु म्हणजे लक्ष्मीबाई यांचा सगळा वेळ खेळण्यात जाई. स्वयंपाकाची त्यांना सवय नव्हती. घरच्या जबाबदाऱ्या, नीटनेटकेपणा हे शब्दच त्यांना ठाऊक नव्हते. सासरी आल्यावर मात्र पत्नीच्या माघारी घर सुव्यवस्थित ठेवणाऱ्या सासऱ्यांनी गबाळेपणा खपवून घेतला जाणार नाही, जिथली वस्तू तिथे ठेवली गेली पाहिजे असा सज्जड दम नवी नवरी म्हणून नुकतेच माप ओलांडून घरात आलेल्या लक्ष्मीबाईंना दिला होता. पहिल्याच दिवशी सासऱ्यांनी तांदळाची भाकरी करायला सांगितले, तेव्हा आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे, याची कल्पना लक्ष्मीबाईंना आली असावी. आयुष्यात पहिल्यांदाच केलेल्या तांदळाच्या भाकरीला, जमिनीला उन्हाळ्यात भेगा पडाव्यात तशा झाल्याने, त्यांना सासऱ्यांची बोलणी खावी लागली होती.

सासरे कोकणातले होते. स्वयंपाक करण्यात हातखंडा असलेले सासरे वामनराव ''पेजबुड्या भात', 'आयती', ''जिवंत फोडणी' अशी एकेक नावे घेऊन ते सुनेला करायला फर्मावत होते. या पदार्थांची कधी नावेही लक्ष्मीबाईंनी ऐकलेली नसायची आणि चव तर माहित नसायची अशा वेळी पाण्याची घागर घेऊन लक्ष्मीबाई विहिरीवर जात. तिथे जोश्यांच्या गंगूबाईंना विचारून त्या

पदार्थाची कृती विचारत आणि घरी आल्यावर तो पदार्थ तयार करून सासऱ्यांपुढे ठेवतकी, जणू काही तो बनवण्यात त्यांचा चांगला हातखंडा आहे! एकदा आपली पिकदाणी घासताना किळस येऊन ती थुंकल्याचे पाहून मोठ्या गोडीत तिचा पाणी प्यायचा तांब्या आपल्याला फार आवडतो असे म्हणून तो मागून घेतला आणित्याचा पिकदाणीसारखा उपयोग त्यांनी केला. लक्ष्मीबाई न्हायला बसल्यावर तिच्या पुढचे न्हायचे गरम पाणी ते उचलून न्यायचे आणि तिला थंडपाण्याने न्हायला भाग पाडायचे.

वरीलप्रमाणे वामनरावांनी लक्ष्मीबाईचा अतोनात छळ केला असला तरी त्यांच्याबद्दल लक्ष्मीबाई म्हणतात, 'मामंजीचे दोन गुण चांगले होते. एकम्हणजे त्यांनी मला कधी अपशब्द वापरले नाहीत व अंगाला कधी हात लावला नाही.' वामनरावांसारख्या अतिविक्षिप्त माणसाचा त्रास सहन करूनही त्यांच्याबद्दल मनात कसलीही अढी बाळगली नाही.

**लक्ष्मीबाई यांचे शिक्षण :**

"खरेंच्या लक्ष्मीबाईं ना लिहिताचाता येते तर टिळकांच्या लक्ष्मीला का येऊ नये?' हा विचार मनात आल्याबरोबर नारायणराव टिळकांनी खिशात होते नव्हते ते सगळे पैसे खर्चून पहिली ते सहावीची पुस्तकेखरेदी करून आणली आणि शिकण्यासाठी समोर बसण्याची आज्ञा त्यांनी बायकोला केली. लक्ष्मीबाईं ना व्याकरणापासून शिकवायलसुरुवात केली. शिक्षणाचे वातावरण माहेरी-सासरी कधीच न पाहिलेल्या लक्ष्मीबाईं ना त्याची गंमत वाटली आणि हसूच येऊ लागले. त्यात नवम्हणजे अत्यंत विद्वान शिक्षक आणि बायको म्हणजे शाळेची पायरीही कधीच न चढलेली, पदरात मूल असूनही अजून भातुकलीतच रमणारीअशी विद्यार्थिनी होती. आपण चांगले शिक्षक आहोत, आठ दिवसांच्या आत आपल्या बायकोने आपल्यासारखे व्हावे' असा वाटणाऱ्या टिळकांनी शिक्षण देण्यास सुरुवात केले.

कै आणि खै, क्ष आणि ज्ञ, ड आणि ढ अशा अक्षरांचा क्रम बोटे मोडल्याशिवाय त्यांना आठवत नसे. जोडाक्षरे लिहिणेही त्यांना जमत नसे. कालांतराने१८८८ च्या सुमारास राजनांदगावी लक्ष्मीबाईं चा अभ्यास सुरू झाला. लक्ष्मीबाईंगतात, "होते नव्हते तितके पैसे खर्च करून पुस्तके आणली! एका बाजूला मी बसले पलीकडे टिळक. मध्ये पुस्तकांचा ढीग. व्याकरणापासू सुरुवात. टिळकांनी विचारले, ''शब्द म्हणजे काय?'' मला सपाटून हसू लोटले हा कसला बाई चमत्कारिक प्रश्न? 'शब्द म्हणजे शब्द!' टिळक खूप संतापले. माझे आपले'शब्द म्हणजे शब्द' ठरलेलेच. मी हसू लागे तसतसे टिळक आणखी संतापत. शेवटी संतापाग्नीने व माझ्या हास्याच्या वायूने मोठा भडका उडाला. पुस्तकांचाही भडका उडाला सारी पुस्तके टिळकांनी टराटर फाडली. ढिगाऱ्याला काडी पेटवून लाऊन दिली.

लक्ष्मीबाई म्हणत, ''मी पान भरून जेवते, पान भरून लिहिते आणि तोंड भरून बोलते.'' टिळकांपुढे बसून लक्ष्मीबाई निमूटपणे शिकल्या असत्यातर मराठी, इंग्रजी संस्कृत या भाषांमधील उच्च साहित्याचा त्यांचाअभ्यास झाला असता.

**लक्ष्मीबाई आणि टिळक यांच्यातील सहसंबध :**

लक्ष्मीबाईं ना संसाराचा गाडाकणे खरोखर कठीण होते. लक्ष्मीबाईं ना वाटे दोघांनीही संसारात लक्ष दिले नाहीतर उपासच घडेल. त्याकाळात ब्राह्मणांच्या बायका बाजारात जात नसत. पण लक्ष्मीबाई मात्र त्याकरताच पापड, बोरे वगैरे साठवून ठेवत. संसारात लक्ष्मीबाई फारच गुरफटतात हे टिळकांना पसंत नव्हते. लक्ष्मीबाईं नी गरीबीमुळे घरात धान्य नसपैसे नसणे अशा सर्व परिस्थितीला तोंड देत होत्या. कितीही हाल झाले तरी चालेल पण स्वतःची हलाखीची परिस्थिती माहेरी शक्यतो कळू नये याची काळजी त्यांनी घेतली. लक्ष्मीबाईं नी अन्नाचा सन्मान नेहमीच केला

टिळक दाम्पत्याला पहिला मुलगा झाला तो विद्यानंद होता. पण त्याचे आयुष्य अल्पायुषी ठरले. त्यानंतर त्यांना एक देखणी मुलगी झाली. तिचे नाव नर्मदा असे ठेवण्यात आले. ती टिळकांची अतिशय लाडकी होती. पण नर्मदाला नव्या तांदळाचे मोदक खाल्ल्याचे निमित्त झाले आणि ताप आला, परिणामी तिचा मृत्यू झाला. यामुळेटिळकांना मुलीच्या अकाली मृत्यूचे दु:ख असह्य झाले. त्या दु:खातिरेकाच्या भरात त्यांनी नाना संत यांच्याशीबोलताना "माझी बायको राक्षसीण आहे, तिने माझी दोन मुले, बाप, भाऊ, बहीण अशी कितीतरी जिवलग माणसे खाल्ली' असे उद्गार काढले. लक्ष्मीबाईं नीही योगायोगाने ऐकले. त्यावर टिळकांनी केलेला आरोप त्यांच्यावरच उलटवत "आपला मुलगा मुलगी आई, बाप, दत्तक बाप, आत्या, सासरा, दीर, नणंद अशी कितीतरी

माणसे ज्या माणसाशी लग्न झाल्यानंतर गेली त्या माणसाला काय म्हणायचे ?' असा प्रतिप्रश्न लक्ष्मीबाई नी नाना संतांना केला आणि टिळकांना आत्मपरीक्षण करायला भाग पाडले. त्या प्रसंगानंतर टिळकांनी असे अभद्र भाष्य कधीच केलेनाही. पतीपुढे ब्र काढण्याची प्रथा त्या काळच्या स्त्रियांमध्ये नव्हती. लक्ष्मीबाई च्या स्वभावात हजरजबाबीपणा तर होताच पण पतीची चूकजिथल्या तिथे लक्षात आणून देण्याचे धैर्यकेले. त्यांनी पुढे काय परिणामहोतील याची तमा बाळगली नाही, असे प्रसंगी दाखवून दिलेले आहे.

टिळक दाम्पत्याच्या आयुष्यात पुन्हा एकदा १६ जुलै १८९१ रोजी मुलगा झाला. त्याचे नाव दत्तू ठेवण्यात आले.टिळकांनी दहा दिवस वाजंत्री लावून दहा रुपयांचे पेढे वाटूनउत्सवच साजरा केला! तेराव्या दिवशी त्याचे नाव 'दत्तात्रेय' ठेवले.

**टिळकांचा ख्रिस्ती धर्माचा स्वीकार :**

राजनांदगावला टिळक दोन वर्षे राहिले. नारायण टिळक हे मनाने अत्यंत आस्तिक असले, तरी त्यांनी मन:शांतीचा शोध चालू ठेवला होता. या शोधात त्यांनी वेगवेगळ्या धर्माच्या ग्रंथांचा अभ्यासकेला होता. राजनांदगावच्या प्रवासात असताना त्यांची भेट एका युरोपियन मिशनरीशी पडली. दोघांच्या गप्पांची गाडी धर्माच्या रुळावर आली. टिळकांचे धर्मविषयक विचार ऐकून त्या परदेशी ख्रिस्ती धर्मगुरुने त्यांनाबायबलच्या दोन भागांपैकी एक असलेला "नवा करार' देऊन दोन वर्षांत तुम्ही खिस्ती व्हाल,असे भाकीत केले. टिळकांचा कल ख्रिस्ती धर्माकडे झुकतो आहे हे आताघरातील सर्वांच्या लक्षात येऊ लागले होते. टिळक ख्रिस्ती झाले तर आपले कसे होणार? एका परित्यक्तेचे जीवन आपल्या नशिबी येणार, समाज, नातेवाईक आपल्यापासून दुरावणार या सर्व विचारांनी लक्ष्मीबाई च्यामनात काहूर उठले. अशा निराश व बेचैनीच्या मन:स्थितीतच लक्ष्मीबाई नीआपली पहिली कविता लिहिली.

*"म्हणे जातो सोडून नाथ माझा!*
*आता कवणाला वाहू देवराया!*
*सर्वव्यापी सर्वज्ञ तूच आहे!*
*सांग, कोणाचे धरू तरी पाये?"*

टिळक वाद्ये आणण्यासाठी सांगून मुंबईला गेले,वाद्ये आली नाहीत पण एक स्फोटक बातमी मात्र आली. 'मुंबईत १० फेब्रुवारी १८९५ रोजी टिळक ख्रिस्ती झाले !'

**टिळकांच्या धर्मातरांचा लक्ष्मीबाई यांच्यावर झालेला परिणाम :**

लक्ष्मीबाई चाव आपल्या दोन वर्षाचा मुलगा दत्तू याचा कोणताही विचार न करता मुंबईला जाऊन टिळकख्रिस्ती झाले. लक्ष्मीबाई आपल्या बहिणीकडे नाशिकला आल्या. 'आम्ही तुला आणि दत्तूला अंतर देणार नाही' असे अभिवचन माहेरच्या माणसांनी दिले तेव्हा आपल्याला टिळक ख्रिस्ती झाल्याचे दु:ख अजिबात झाले नसल्याचे लक्ष्मीबाईदाखवतात. जाईना का आपला नवरा ख्रिस्ती धर्मात, कुठेही असला तरी सुखरूप असावा असेच त्यांनामनापासून वाटले. आपली बायको अशा परिस्थितीत जीव देण्याचा प्रयत्न करील ही भीती जशी टिळकांना वाटत होती तशी लक्ष्मीबाई च्या माहेरच्यामाणसांनाही वाटत होती. लक्ष्मीबाई यांचे भाऊ-बहीण त्यांना आपल्यामध्ये घेऊन त्यांच्या अंगावर आपला हात ठेवून झोपत. नारायणाशिवाय लक्ष्मीच्या जीवनाला अर्थ नाही अशी अवस्था टिळकांनी परधर्मात प्रवेश केल्यावर लक्ष्मीबाई ची झाली. हातापायातलीशक्ती जाणे, दातखीळ बसणे, डोके भणभणने, सगळे शरीर लाकडासारखे कडक होणे, जिभेवर काटे येणे असे काहीबाही त्यांना होऊ लागले. कोणाला वाटले, हिला संतापवायू झाला आहे; कोणाला वाटले, हिने काचा कुटून खाल्ल्या की काय; कोणाला वाटले, हिने विष घेतले असावे. भिकुताईने आपले आजारपण विसरून आपल्या धाकट्या बहिणीची सेवा आपल्या पोटच्या बाळाप्रमाणे केली ती अगदी दात घासण्यापासून तर थेट दूधताक पाजण्यापर्यंत केली. पुढे जेवणसुद्धा त्यांना जबरदस्तीने घातले. ज्यावेळी लक्ष्मीबाई लुगडी फाडू लागली तेव्हा भिकूताईला वाटले, ही आता वेडी होणार. टिळकांच्या धर्मांतरामुळे लक्ष्मीबईंची गावात सवाष्णीत गणना केले जात नसे.

साडेचार वर्ष लक्ष्मीबाई व टिळक वेगळे राहिले. पण दोघांनाही कधीही एकमेकाचे विस्मरण झाले नाही. अशा दु:खी मानसिकतेत असतानाच एक दिवस टिळकांचे भाऊ सखारामपंत लक्ष्मीबाई ना म्हणाले'वहीनी तुम्ही आजारी आहात कितीतरी

माणसे तुमचे करीत आहेत तसे तिकडे नानांचे कुणीतरी करीत असेल का? तुम्ही त्यांना सोडपत्र द्या म्हणजे ते मोकळे होतील. तुमची काळजी घेणारी माणसे आहेत.' हे ऐकून लक्ष्मीबाई यांना खूप राग आला आणि त्यांनी सखारामपंताना रोखठोक उत्तर दिले. या उत्तरावरून वेळप्रसंगी अत्यंत कडक होणारा लक्ष्मीबाईं चा स्वभाव दिसून येतो. त्या म्हणाल्या, त्यांना नव्हती का काळजी घेणारी माणसे? आता कुठे ते बांधलेले आहेत सोडपत्र कशाचे देऊ मी का पळून गेले का निघून गेले? जसे त्यांचे कुणी नाही तसे माझेही कुणी नाही. माझ्याजवळ पैसा नाही, विद्या नाही, मूल लहान मी काय करणार? तुमची सगळ्यांची भांडीच घासणार की नाही. तुमची शिष्टाई पुरे. त्यांना पत्र पाठवा म्हणावे आधी बायकोचे लग्न नीटनेटके लावून द्या आणि मग स्वतःचे लग्न करा. तुम्हाला काही वाटत नाही का? आपण कोणाशी बोलतो ते. लक्ष्मीबाईं च्या या सडेतोड उत्तराने सखारामपंत गप्प झाले. वरील प्रसंगासारखे अनेक मानसिक आघात लक्ष्मीबाईं नी विरहकालात सहन केले. पण त्या सर्वातूनही लक्ष्मीबाईं ची सडेतोड वृत्ती व लग्नाच्या अतूट नात्यावरील श्रद्धा दिसून येते. भिन्न शरीर एकच आत्मा नवल असे हे घडले म्हणजे त्याला लग्न म्हणावे, देवाने घडविले!

**धर्मांतरानंतर लक्ष्मीबाईंचे बदलते विचार :**

लक्ष्मीबाई आणि टिळकांनी जरी एकमेकांना स्वीकारले असले तरी तत्कालिन ब्राह्मणी समाजात त्यांचा स्वीकार होणे कठीण होते. कुठल्याही ब्राह्मणी वस्तीत त्यांना घर मिळाले नाही. तसेच विहिरीचे पाणी भरण्यासाठी वा इतर कामासाठी ब्राह्मणही त्यांना मिळत नसे. लक्ष्मीबाई सोवळे ओवळे पाळत असल्यामुळे या गोष्टींचा त्यांना त्रास होत होता. महाबळेश्वरला असताना लक्ष्मीबाईंवर एकदा मुसलमानाच्या हातचे पाणी पिण्याचा प्रसंग आला त्यावेळी कसेतरी त्यांनी पाणी पिण्याचा प्रयत्न केला पण त्यांना सपाटून वांती झाली. टिळकांनाही या गोष्टीचे वाईट वाटले. अशा अस्वस्थ मनःस्थितीत लक्ष्मीबाईं च्या मिटलेल्या डोळ्यापुढे तेजस्वी प्रकाश दिसला व त्यांच्या मनामध्ये एक विलक्षण विचार चमकून गेला. देवाने जाती केल्या की माणसाने, देवाने केल्या असत्या तर माणसामाणसात फरक ठेवला असता ना? जन्म मरण, हाड मांस, बुद्धी, बरे वाईट जाणण्याचे सामर्थ्य, सुख दुःख ही मानव जातीस सारखीच आहेत ना? आणि मनुष्य जातीत जर देवाने जाती केल्या तर देवाने प्राणी सृष्टीत का निरनिराळ्या जाती केल्या नाहीत, ब्राह्मण बेल, क्षुद्र बैल, वैश्य कावळा, अतिक्षुद्र कावळा असे भेद पशु-पक्षांत कोठे आहेत? ब्राह्मण व क्षुद्र यात फरक कोठे आहे? क्षुद्राच्या शिरी नंदीचे शिंग नाही की ब्राह्मणाच्या कपाळी महादेवाचे लिंग नाही'. या विचारासरशी लक्ष्मीबाईं च्या मनात विलक्षण परिवर्तन घडून आले व त्यांनी विटाळ मानण्याचे सोडून दिले.

**लक्ष्मीबाई यांचा ख्रिस्त धमार्चा स्वीकार :**

ख्रिस्ती लोकांमध्ये राहून लक्ष्मीबाईं च्या पूजापाठाचे आणि सोवळयाचे प्रस्थ जवळजवळ संपुष्टात आले होते. ख्रिस्ती धर्माबाबत, ख्रिस्ताबाबत आता त्यांना बरेच कळले होते. प्रार्थनेला बसण्याची, बायबल वाचण्याची ओढही त्यांना वाटू लागली होती. लक्ष्मीबाईं ना दोन धन्यांची चाकरी कोण करू शकेल ?' हे बायबलमधले वचन आठवले. खरेच, आपण सध्या दोन धन्यांची चाकरी करतो आहोत, असे लक्ष्मीबाईं ना वाटले. ख्रिस्ताला आपला देव म्हणून स्वीकारण्याचा निश्चय त्यांच्या मनाने केला आणि सांयप्रार्थना संपल्यावर घरातल्या कुणालाही न सांगतासवरता लक्ष्मीबाई रेव्ह. डॉ. बॅलेंटाईन यांच्या बंगल्यावर पोहचल्या आणि त्यांना मला आत्ताच्या आत्ता बाप्तिस्मा द्या म्हणू लागल्या. लक्ष्मीबाईं च्या बायबलविषयक ज्ञानाची परीक्षा घेण्यात आली. त्यावेळी जमेल तशी उत्तरे लक्ष्मीबाईं नी सांगितले आणि परीक्षेत पास झाल्या. टिळकांनी भारतीय धर्मगुरुच्या हातून बाप्तिस्मा घेतला तसा आपलाही बाप्तिस्मा भारतीय धर्मगुरूंच्या हातून व्हावा असा त्यांचा आग्रह होता. ८ जुलै १९०० रोजी राहुरीच्या देवालयात रेव्ह. वणीराम बापूजी ओहोळ यांच्या हातून लक्ष्मीबाईं बरोबर दत्तू आणि जोशी या त्यांच्या मानलेल्या मुलीचाही बाप्तिस्मा झाला.

**सेवाभावी कार्य :**

लक्ष्मीबाईं चा स्वभाव मुळातच दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याचा होता. स्वतःहून कोणालाही मदत करण्याची त्यांची आवड उपजत होती. ख्रिस्ती धर्मातील सेवा या प्रधान तत्त्वाने त्यांना आणखी सेवादक्ष केले. टिळकांच्या बरोबरीने प्लेगच्या साथीत रोग्यांची सेवा करताना लक्ष्मीबाईं ना आपल्या नर्सिंगच्या ज्ञानाचा उपयोग समाजसेवेसाठी करता आला. या ज्ञानाच्या जोडीला भक्तीचीही जोड

त्यांनी दिलेली दिसते. प्लेग झालेल्या ताराला पंधराव्या दिवशी मांडीवरून खाली उतरवून शेवटचाउपाय म्हणून जवसाच्या पिठाचे पोटीस बांधण्याचा उपचार त्यांनी केला, तिला ब्लँकेटमध्ये गुंडाळले आणि त्या म्हणाल्या, "आता खुशाल मर.तुझ्यासाठी काही केलं नाही असं मला वाटायला नको. नंतर रानात जाऊन टाहो फोडून तिच्या आरोग्यासाठी येशूला विनवले आणि म्हटले, "ती जगली तर इथेच राहून रोग्यांची सेवा करीन.' या प्रमाणे टिळक व लक्ष्मीबाई यांनी रोग्यांची सेवा तेथेच राहून केली.

नाशिकच्या "हरिजन सेवा संघातील कामात लक्ष्मीबाई नीस्वत:ला झोकून दिले होते. त्यांची वस्ती साफ करणे, मुला-मुलींनान्हाऊ घालणे, त्यांना शिकवणे या गोष्टी एकेकाळी कडक सोवळेपाळणाऱ्या लक्ष्मीबाई नी मनापासून केल्या.

'दया' आणि 'हौशी' या दोन मुली, एक भीक मागणाऱ्या मातेच्या मुलीला त्यांनी'दया' हे नाव देऊन सन्मानाने जगण्याची संधी दिली, तर रेल्वेमध्ये भीक मागणाऱ्या मुलीला 'हौशी' म्हणून स्वीकारले. लक्ष्मीबाई नी या मुलींना केवळ आश्रय दिला नाहीतर त्यांना विविध गृहोपयोगी कलांमध्ये (जसे की लोणची, पापड, चटण्या बनवणे) निपुण करून स्वावलंबी बनवले.

दुष्काळाच्या भीषण परिस्थितीत जेव्हा मिशनच्या बोर्डिंगमधून २२ मुलांना अचानक बाहेर काढण्यात आले, तेव्हा लक्ष्मीबाई आणि रेव्हरंड टिळक यांनी दाखवलेले धैर्य सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण ठरते. "आपण जे खातो, तेच या मुलांना देऊ" हा त्यांचा विचार त्यांच्या निःस्वार्थ दातृत्वावर शिक्कामोर्तब करतो. मांग वस्तीत संडासाचीसोय आवश्यक असल्याचे लक्षात आल्यावर लक्ष्मीबाई नी या प्रश्नीस्वत: लक्ष घालून काम पूर्ण करून घेतले.

**टिळकांचा मृत्यू :**

टिळकांना मूळव्याधीचे दुखणे जास्तच त्रासदायक ठरू लागले. डॉक्टरांचे म्हणणेहोते टिळकांनी ऑपरेशन करवून घेऊ नये, टिळकांना वाटत होते आपल्याला खूप कामे अजून करायची आहेत, त्यासाठी लवकर यातून बरे व्हायला ऑपरेशन हाच मार्ग आहे म्हणून जे.जे.हॉस्पिटलमध्ये ऑपरेशनसाठी ते मुंबईत आले. पण ९ मे १९१९ टिळकांचे दु:खद निधन झाले.पतीच्या मृत्युनंतर पत्नीने घराबाहेर पडायचे नाही, केशवपन करून, अलवाण नेसून, अळणी जेवण खाऊन, घरात आश्रितासारखे राहून, कष्ट करीत दिवसागणिक मरायचे अशा काळात आपल्या पतीच्या अंत्ययात्रेत लक्ष्मीबाई सर्वात पुढे चालत होत्या. तसेच त्यांनी आपल्या पतीचे आवडते गीत गायले. वैधव्य आल्यानंतर स्त्रीला अनुभवावी लागलेली शापितासारखी वागणूक, मानहानी, अवहेलना लक्ष्मीबाई नी आसपासच्या स्त्रियांबाबत पूर्वधर्मात पाहिली होती. ख्रिस्ती धर्माच्यास्वीकारामुळे लक्ष्मीबाई च्या वाट्याला ते भोग आले नाहीत.

**लक्ष्मीबाई यांचा व्यक्तिमत्व विकास :**

लक्ष्मीबाई नी स्वतःच्या वक्तृत्व शैलीचा विकास कसाझाला हेसुद्धा सांगितले आहे. टिळकांनी त्यांना पहिल्या वेळेस भाषण लिहून दिले होते, तरी मी यापुढे लिहून दिलेले भाषण म्हणणार नाही असा लक्ष्मीबाई नी निर्धार केला. टिळकांनी स्वभावाच्या सरळपणामुळे कधी कोणाचे मन दुखावले नाही. पण लक्ष्मीबाई मात्र एखाद्याची चूक त्याच्या बरोबर दाखवून देत. लक्ष्मीबाई नी त्यांच्या घरी आलेल्या तरुण ब्राह्मणाचा शंकेखोर स्वभाव पाहिला आणि त्याची कानउघडणी केली.

लक्ष्मीबाई यांनी कवितांच्या लेखनाला सुरुवात केली.टिळकांनी सुरू केलेल्या'अभंगांजलि' या 'ज्ञानोदय'मधील सदरात टिळकांच्या निधनानंतर लक्ष्मीबाई नी अभंगलेखनही केले. टिळकांच्या हातून अपूर्ण राहिलेल्या'ख्रिस्तायन' लिहून लक्ष्मीबाई नी 'ख्रिस्तायन' पूर्ण केले. शेवटचा अध्याय देवदत्त टिळकांनी लिहिला.

**स्मृतिचित्रे :**

लक्ष्मीबाई यांनी लिहिलेले अविस्मरणीय आत्मकथन 'स्मृतिचित्रे' या नावाने प्रसिद्ध आहे. १९३६ साली ते प्रथम प्रकाशित झालेले होते. 'स्मृतिचित्रे'च्या मूळ चार भागांपैकी तीन भाग टिळकांनी व्यापलेला आहे. टिळकांच्या जीवनातील चढउतार, स्थित्यंतरे, वडिलांकडून त्यांच्यास्वभावात उतरलेला संतापी आणि काहीसा विक्षिप्त स्वभाव, आईकडून आलेली काव्यप्रतिभा, उत्तरोत्तर शांत आणि विरागी होत गेलेले टिळक असा एक आलेख लक्ष्मीबाई नी सर्व बारकाव्यांनिशी फार सहजसुंदरपद्धतीने रेखाटलेला आहे.

नाशिक येथे आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली लक्ष्मीबाईंच्या साहित्यातील योगदानासाठी भव्य सत्कार करण्यात आला. त्यावेळी आचार्य अत्रे यांनी लक्ष्मीबाईंचा उल्लेख 'साहित्यलक्ष्मी' असा केला. १९३३ मध्ये नागपूर येथे भरलेल्या मराठी ख्रिस्ती साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते त्याच वर्षी नाशिकच्या कविसंमेलनाचे त्यांना स्वागताध्यक्ष करण्यात आले. २४ फेब्रुवारी १९३६ रोजी त्यांचे नाशिक येथे निधन झाले.

**सारांश :**

लक्ष्मीबाई यांच्या वाट्याला लहानपणापासून जे वातावरण आले त्यात कोणत्याही माणसाची घुसमट झाली असती किंवा त्या माणसामध्ये विकृती निर्माण झाली असती; पण लक्ष्मीबाई यांनी ते सर्व सहजतेने स्वीकारले. त्यांचा स्वभाव खेळकर व आनंदी होता. त्यांनी स्वतःचे वर्णन मनाने व शरीराने चिवट असे केले आहे. हिंदू संस्कारांमध्ये वाढलेली स्त्री बदलत कशी जाते आणि तिचा विकास कसा होतो याचा आलेख दिसतो.

**संदर्भ सूची :**

१. उजगरे अनुपमा, (२०१६), *"लक्ष्मीबाई टिळक"*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र शासन, मुंबई.

३. गोपूजकर प्रतिभा, (२००७), *"कर्तुत्वशालिनी (भाग १)"*, श्री विद्या प्रकाशन, पुणे.

४. टिळक ना.वा., टिळक लक्ष्मीबाई, टिळक देवदत्त, (१९३६), *"ख्रिस्तायान"*, प्रकाशन देवदत्त नारायण टिळक, शांती सदन, नाशिक.

५. टिळक लक्ष्मीबाई, (२०१३), *"स्मृतिचरित्र"*, वरद प्रकाशन, पुणे.

❑❑❑